दुरध्वनी क्र.०२२-२६८५६५४२
फॅक्स क्र. ०२२-२६८५६१२०
ई-मेल-srpfgr८@rediffmail.com

महाराष्ट्र शासन
समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८,
कॅम्प गोरेगांव (पूर्व) मुंबई.४०००६५

जा.क्र. समा.रारापोबल/गट—८/आशा/सपोशि भरती २०२२—२३/ 508 /२०२४, मुंबई, दि. /०२/२०२४

2 9 FEB 2024

प्रति,

मा. अपर पोलीस महासंचालक,
प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**संदर्भ**:— आपलेकडील पत्र क्र.प्रशि/पो.शि.भरती—प्रक्रिया २०२१/१८८/२०२१/१८८/२०२१/२७९,दि.२८/०२/२०२४.

**विषय**:— सन २०२२—२३ या वर्षातील पोलीस शिपाई संवर्गातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया राबविण्या करीता जाहिरात प्रसिध्द करण्याबाबत.

——००——

उपरोक्त संदर्भाधीन विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८, मुंबई—६५ यांच्या आस्थापनेवरील सन २०२२—२३ ची रिक्त होणा—या एकुण ४६० सशस्त्र पोलीस शिपाई (पुरूष) पदे भरण्यासाठीची जाहिरात दि. ०१/०३/२०२४ रोजीच्या वर्तमानपत्रामध्ये जिल्हास्तरीय आवृत्तीमध्ये प्रसिध्द करण्यासाठी वरिष्ठ सहाय्यक संचालक, (जाहिरात प्रशासन) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांचेकडे दि.०१/०३/२०२४ रोजी पत्रव्यवहार करण्यात आलेला असुन त्याची एक प्रत सोबत जोडुन सादर केली आहे.

या गटातील सशस्त्र पोलीस शिपाई भरती सन२०२२—२३ ची जाहिरात **policerecruitment2024.mahait.org** आणि **www.mahapolice.gov.in** या संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यासाठी या सोबत जोडुन सादर करीत आहोत.

**( मोक्षदा पाटील ) भापोसे,**
समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ८, मुंबई.

**प्रत सविनय सादर,**

मा.अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे

**प्रत सादर,**

व्यवस्थापक, महाआयटी विभाग, मुंबई ( **लक्षवेध :— raunak.saraf@mahait.org** )

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

## संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची जाहिरात

**महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई भरती–२०२२–२०२३**

**समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८, गोरेगांव,(पूर्व) मुंबई–६५.**

**जाहिरात क्रमांक–** 508 **ठिकाण: मुंबई,** **दि.** 29 /०२/२०२४

महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरूष) (सेवाप्रवेश) नियम २०१२ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक २३/०६/२०२२ च्या आदेशान्वये केलेल्या सुधारणांनुसार समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८ गोरेगांव, मुंबई–६५ यांचे आस्थापनेवर सन २०२२–२३ मध्ये सशस्त्र पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी ४६० पदे भरण्यासाठी सशस्त्र पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

### १) सशस्त्र पोलीस शिपाई

| | अ. जा. | अ.ज | वि.ज. –अ | भ.ज. –ब | भ.ज. –क | भ.ज. –ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ईडब्लूएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | 60 | 32 | 14 | 12 | 16 | 9 | 9 | 87 | 46 | 46 | 129 | 460 |
| कप्पीकृत आरक्षण | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 36 | 17 | 8 | 6 | 10 | 8 | 8 | 53 | 29 | 29 | 79 | 283 |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| खेळाडू | 3 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 4 | 2 | 2 | 6 | 22 |
| प्रकल्पग्रस्त | 3 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 4 | 2 | 2 | 6 | 22 |
| भूकंपग्रस्त | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 3 | 09 |
| माजी सैनिक | 9 | 5 | 2 | 2 | 2 | 1 | 1 | 13 | 7 | 7 | 19 | 68 |
| अंशकालीन पदवीधर | 3 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 4 | 2 | 2 | 6 | 22 |
| पोलीस पाल्य | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 1 | 1 | 4 | 12 |
| गृहरक्षक दल | 3 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 4 | 2 | 2 | 6 | 22 |
| अनाथ | महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.अनाथ – २०२२/प्र.क्र.१२२/का–०३, दि.०६.०४.२०२३ मधील तरतुदीनुसार एकुण रिक्त पदांच्या १% इतकी पदे. | | | | | | | | | | | |

**महत्वाची टीप:–** राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाची मागणी केल्यास संबंधित उमेदवाराने त्याबाबतची माहिती अ‍ॅन्टीकरप्शन ब्युरो, मुंबई यांना दुरध्वनी क्रमांक ०२२–२४९२१२१२ वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८ गोरेगांव मुंबई–६५ या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष, सशस्त्र पोलीस भरती समिती–२०२२–२३ तथा समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८ गोरेगांव मुंबई–६५, दूरध्वनी क्र. ०२२–२६८५६५४२ यांच्याशी संपर्क साधून तक्रार करू शकतील.

उमेदवारांना काही अडचण आल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र | संस्था / कार्यालयाचे नाव | दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक / ई मेल आय–डी |
|---|---|---|
| १ | समादेशक कार्यालय, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८, गोरेगाव (पूर्व) मुंबई–६५, | दूरध्वनी क्र. ०२२– २६८५६५४२<br>फॅक्स क्र. ०२२ – २६८५६१२०<br>cmdt.srpf8.mumbai@mahapolice.gov.in |

( मोक्षदा पाटील ) भापोसे,
समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ८, मुंबई.

Scanned with CamScanner

## समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८ मुंबई सशस्त्र पोलीस शिपाई भरती–२०२२–२३

महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरूष) (सेवाप्रवेश) नियम २०१२ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या आणि सेवाप्रवेश नियमात केलेल्या दिनांक २३/०६/२०२२ रोजीच्या सुधारीत तरतुदीनुसार समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८ गोरेगांव, मुंबई–६५ यांचे आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपाई यांची रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे दिनांक ०५/०३/२०२४ ते ३१/०३/२०२४ या कालावधीत स्विकारण्यात येतील. या बद्दलची सविस्तर माहिती **policerecruitment2024.mahait.org** आणि **www.mahapolice.gov.in** या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहितीकरिता प्रसिध्द करण्यात आली आहे.

- उमेदवारास सशस्त्र पोलीस दलातील समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८, मुंबई–६५ यांच्या आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपाई या पदासाठी ऑनलाईन आवदेन अर्ज सादर करता येतील. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा **policerecruitment2024. mahait.org** या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.
- उमेदवार एका पदाकरिता संपुर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करु शकतो.
- उमेदवाराने चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.
- राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची प्रथम १०० गुणांची शारिरीक चाचणी परीक्षा घेण्यात येईल व त्यानंतर होणारी लेखी परीक्षा ही राज्य राखीव पोलीस बलातील सर्व गटांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल, त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेऊनच आवेदन अर्ज भरावा.
- भरती प्रक्रियेमध्ये प्रथम शारिरीक चाचणी घेण्यात येणार आहे. शारिरीक योग्यता चाचणीमध्ये किमान ५० टक्के गुण मिळवणारे उमेदवारांमधुनच संबंधित प्रवर्गातील जाहिरात दिलेल्या रिक्त पदांच्या १:१० प्रमाणात उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळवणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्केपेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.
- शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये नमुद केलेल्या दोन निकषांच्या निकालाच्या आधारे उमेदवारांकडून एक गुणवत्ता यादी तयार केली जाईल. तात्पुरत्या निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवांराचीच मूळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसूचीतील उमेदवारांची निवड तात्पुरती (Provisional Selection) असेल. शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणाचे एकत्रिकरण केल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय, दि.१०.१२.२०२० नुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.
- सशस्त्र पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक अर्हता, शारिरीक पात्रता, आवश्यक असलेले प्रमाणपत्रे/कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सुचना **policerecruitment2024.mahait.org** या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. सदरहू जाहिरात उमेदवारांनी काळजीपूर्वक वाचून, समजून घ्यावी. तसेच, सामाजिक, समांतर आरक्षण व अनाथांकरिता उपलब्ध पदांच्या १% आरक्षित जागा विचारात घेऊन रिक्त पदांबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

- भरती प्रक्रियेदरम्यान शारिरीक चाचणी व लेखी चाचणीमध्ये निश्चित केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहिल्यास, त्यास भरती प्रक्रियेतुन बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चित केलेल्या दिनांकामध्ये कोणताही परिस्थिती बदल करण्यात येणार नाही.
- उमेदवारांनी संकेतस्थळावर जावून आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे, त्या संबंधित घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेवूनच उमेदवाराने अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात (Unreserved) अर्ज करु शकतात, परंतु खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करु शकणार नाहीत.
- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.२७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

**( मोक्षदा पाटील ) भापोसे,**
समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ८, मुंबई.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner